सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
GOVERNMENT COLLEGE OF ENGINEERING, JALGAON
(An Autonomous Institute of Government of Maharashtra)
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
National Highway 53, Jalgaon-425002 | राष्ट्रीय महामार्ग ५३, जळगाव-४२५००२
Phone: (0257) 2281522,2280531,2280534 | फोन (०२५७) २२८१५२२,२२८०५३१,२२८०५३४
Email: principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in Website: www.gcoej.ac.in

जा. क्र.: शाअमज/आस्थापना/२०२४/2917 दिनांक: 5 SEP 2024

# सूचना

विषय- तात्पुरत्या तत्वावर शिक्षकांच्या नियुक्तीबाबत अटी व शर्ती

वरील विषयाच्या अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगांव येथील यंत्र अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, उपकरणीकरण अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, विज्ञान आणि मानवता अभ्यासक्रमासाठी प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस, ॲडजंक्ट फॅकल्टी या पदासाठी अर्ज मागविण्यात येते आहेत. संस्थेचे शैक्षणिक कार्य पुर्ण करणेसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता तात्पुरत्या स्वरूपात प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस ॲडजंक्ट फॅकल्टी (Adjunct Faculty) पदासाठी पुर्णपणे तात्पुरत्या तत्वावर नियुक्तीसाठी इच्छुक उमेदवारांनी संस्थेच्या नियामक मंडळाच्या मान्यतेच्या अधीन राहून आणि खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज करावा:

१. इच्छुक उमेदवारांनी दिनांक १०/०९/२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी १२:०० वाजेच्या दरम्यान प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, जळगाव यांचे नावे अर्ज संबंधित विभागात जमा करावा. उमेदवारांनी स्वत: उपस्थित असणे आवश्यक आहे.
२. अर्जासोबत संबंधित कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकीत छायाप्रतींचा एक संच जोडला जावा. कृपया आवश्यक मुळ शैक्षणिक पात्रता आणि इतर कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत तयार ठेवावी.
३. कागदपत्रांच्या पडताळणीनंतर वैध अर्जाच्या मुलाखती त्याच दिवशी (१०.०९.२०२४) सकाळी ११ वाजता सुरु होतील.
४. नियुक्तीचा आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांना शैक्षणिक सिध्दांत व्याख्याने (Theory Lecturers) प्रात्यक्षिक सत्रे (Practicals), परीक्षेशी संबंधित कामे आणि विभाग प्रमुख / संस्थेच्या इतर अध्यापकांच्या आदेशानुसार इतर कामे करणे बंधनकारक राहिल.
५. उमेदवारांची नियुक्ती शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ साठी पुर्णपणे तात्पुरत्या आधारावर केली जाईल. नियमितपणे शासकीय सेवेत रुजू होण्याबाबत कोणाताही दावा उमेदवारांना करता येणार नाही.
६. प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस आणि ॲडजंक्ट अधिव्याख्याता या पदांसाठीच्या अटी व शर्ती AICTE / महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार असतील.
७. मुलाखतीसाठी उपस्थित उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास व दैनंदिन भत्ता देय राहणार नाही.

८. चुकीची/खाटी माहिती दिल्यास, संबंधितांचा अर्ज कोणत्याही टप्प्यावर रद्द केला जाईल.

९. शैक्षणिक पात्रता आणि इतर पात्रता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद नवी दिल्ली /महाराष्ट्र शासन यांच्या मानकातील तरतुदीनुसार लागू राहतील.

१०.संबंधित उमेदवारांनी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात अर्ज सादर करणे बंधनकारक राहील.

११.निवड झालेल्या उमेदवाराने सोबतच्या विहीत नमुन्यातीलन प्रपत्र - ई मध्ये रुपये ५००/- स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१२. सर्व अटी- शर्तीचे पालन करुनही कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता नियुक्त्या रद्द करण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखून ठेवला आहे.

04/09/2024

(डॉ. सुहास सुधाकरराव गाजरे )
प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव